# आरंभीच्या 400 वर्षातील ख्रिस्तीधर्माचा प्रसार

मुलांना शिकवणाऱ्यांनी H4b1 हा अभ्यास वाचावा

1. **ख्रिस्त धर्माचा इतिहास तुमच्या लोकांना शिकवण्यासाठी तुम्ही प्रार्थना आणि वचनाच्या द्वारे स्वत: ची तयारी करा.**

प्रार्थना. ''ह्या पृथ्वीवरील तुझे कार्य इतिहासाच्या द्वारे समजून घेण्यासाठी आमचे सहाय्य कर.''

**सूचना:** येशू मरण पावला आणि पुन्हा उठला त्यानंतरच्या आरंभीच्या 400 वर्षाच्या काळात ख्रिस्ती विश्वासाचा प्रसार आशिया व युरोप खंडातील रोमन साम्राजाच्या अधिपत्याखालील बहुतेक शहरांत तसेच प्रातांत झाला रोमन अधिकाऱ्यांनी वारंवार ख्रिस्ती लोकांचा विरोध केला आणि त्यापैकी कित्येकांना जिवे माराले. तथापि येशूने सांगितले होते अगदी त्या प्रभाणेच त्याची सुवार्ता सर्वत्रर पसरत राहिली.

येशूने त्याच्या सुवार्तेविषयी काय सांगितले होते ते **मत्तय 24:14; 28:18 व प्रे. कृ. 1:8** या शास्त्रभागात पाहा.

- कोणती राष्ट्रे व लोक सुवार्ता ऐकतील *(मत्तय 24:14)*
- जगाचा शेवट होण्यापूर्वी काय घड़णे अगत्याचे आहे? *(24:14)*
- आम्हा विश्वासणाऱ्यांना इतर लोकांच्या गटांकडे पाठविण्याचा अधिकार कोणाला आहे? *(28:18)*
- आम्ही येशूसाठी नवे शिष्य करण्याकरीता कोठे गेले पाहिजे? *(28:19)*
- सुवार्तेचा प्रसार किती काळ पर्यंत होत राहणार आहे? *(28:20)*
- येशूने साक्ष देण्यासाठी कोठे कोठे जाण्यास सांगितले? *(प्रे. कृ. 1:8)*

मिशनरींशिवाय ख्रिस्ती धर्माचा प्रसार कसा झाला ते **प्रे. कृ. 7:59-8:5** ह्या शास्त्रभागात पाहा:

- स्तेफनसारख्या काही ख्रिस्ती लोकांच्या बाबतीत काय घडले *(7:59 व 60)*
- यरूशलेममधील मंडळीच्या बाबतीत काय घडले? *(8:1)*
- ख्रिस्ती लोक कोठे गेले? *(1)*
- गृहमंडळयांच्या सभासदांशी पौल कसा वागाला? *(3)*
- इतर शहरांमध्ये ख्रिस्ती लोकांनी काय केले? *(4 व 5)*

**सूचना:** पुढे काही काळाने शौल ख्रिस्ती झाला आणि मिशनरी म्हणूलन सेवा करू लागला, तसेच त्याने आपले नाव बदलून पौल हे नाव घेतले छळ करण्याचे दोन प्रकार होते: सूडबुध्दीने द्वेशने पेटलेल्या लोकांनी ख्रिस्ती लोकांचा गुन्हेगारां प्रमाणे छळ केला आणि ख्रिस्ती लोकांचे येशूवर प्रेम असल्यामुळे त्यांच्यावर खटले भरले.


मिशनरींनी ख्रिस्ती धर्माचा प्रसार कशा प्रकारे केला ते **प्रे. कृ. 14:21-23** ह्या शास्त्रभागात पाहा:

- मिशनरी कोणत्या प्रकारच्या भागांमध्ये गेले? *(21)*
- त्या शाहरांमध्ये त्यांनी काय केले? *(22)*
- त्यांचा संदेशाचा विषय काय होता? *(23)*
- त्यानी प्रत्येक शहरात कोणत्या प्रकारच्या नव्या मंडळया सुरू केल्या? *(23)*
- ह्या नव्या मंडळ्यांमध्ये सेवा करणारे नेते कसे होते? *(23)*

प्रेषित पौलाने आपल्या सेवेच्या कार्याविषयी **रोम 15:18-21** ह्या वचनांमध्ये काय लिहिले आहे ते पाहा:

- ख्रिस्ताचे आज्ञापालन कोणी केले? *(18)*

- पौलाचे काम काय होते? *(19)*
- तो येरूशलेमेहून कोठे गेला? *(19)*
- त्याने कोणत्या भागांना भेटी देण्याचा प्रयत्न होता? *(20)*
- दुर्लक्षित लोकांविषयी देवाने कोणते अभिवचन दिले आहे? *(21)*




येशूची सुवार्ता रोमन साम्राज्यात सर्वत्र पसरली. ख्रिस्ती लोकांना बंदिवान म्हणून घेऊन गेल्यावर आसपासच्या लोकांमध्येही सुवार्ता प्रसार झाला. विश्वास न ठेवणाऱ्या अधिकाऱ्यांकडून ख्रिस्ती लोकांचा छळ झाला तरी साम्राज्यातील बहुतेक लोक ख्रिस्ती झाले कारण:

- ख्रिस्ती लोकांनी गर्भपाताला विरोध केला त्यामुळे महिलांच्या आरोग्याचे रक्षण झाले,
- ख्रिस्ती लोकांनी बालहत्येला विरोध केला, त्या मुळे त्यांची अधिक लेकरं होती.
- ख्रिस्ती लोकांनी आजाऱ्यांची सेवा शुश्रूषा केली, त्यामुळे अनेकांचे जीवन वाचले.
- ख्रिस्ती लोकांना स्त्रियांबद्दल आदर होता, त्यांनी त्यांना योग्य दर्जा देऊन त्यांचे रक्षण केले.
- ख्रिस्ती लोकांनी विधवांचे आणि अनाथ मुलांचे स्वागत केले.
- ख्रिस्ती लोकांनी वांशिक सामंजस्याचा पुरस्कार केला, नागरी लोकांमध्ये ऐक्यत्व निर्माण केले,
- ख्रिस्ती लोक वैवाहिक जीवनात जोडीदाराशी प्रामाणिक राहिले, त्यामुळे प्रजनन दर आणि आयुर्मर्यादा वाढली,
- ख्रिस्ती लोकांनी जीवना बद्दल आदर दाखवला त्यामुळे मानवाचा दर्जा उंचावला.
- ख्रिस्ती लोक कृपेने व पवित्र आत्म्याने जीवन जगतात अशा प्रकारे ते नव्या कराराचा अवलंब करतात.

## उल्फा आणि गॉथ

पहिल्या चार शतकांमध्ये, रोमन नसलेले लोक रोमन साम्राज्यात येऊन स्थायिक होण्यास सुरुवात झाली गॉथ येथील चोरांनी उल्फाज् नावाच्या तरुण रोमन नागरिकाचे अपहरण केले आणि त्याला रोमालिया मध्ये दानूबे नदीजवळ असणाऱ्या त्यांच्या प्रातांत नेले तिथे तो ख्रिस्ती झाला कालांतराने गॉथ लोकांनी त्याला अभ्यास करण्याची परवानगी दिली, आणि तुर्की येथील कॉन्स्टॅनटीनोपोल येथे त्याची बिशप म्हणून प्रतिष्ठापना करण्यात आली. उल्फाज पुन्हा गॉथ लोकांकडे आला, त्यांची जीवन पध्दती त्याने आपलीशी केली चाळीस वर्षे तो त्यांना सुवार्ता सांगत शहरा शहरातून फिरला. प्रवासासाठी तो वॅगन वापरीत असे तो इ. स. 382 मध्ये मरण पावला पण त्यापूर्वी त्याने गॉथ लोकांना वर्णाक्षरे शिकवली आणि त्यांच्यासाठी पवित्र शास्त्राच्या बहुतेक भागाचा अनुवाद केला. इ. स. 410 मध्ये गॉथ लोकांनी रोमन साम्राज्याचा धुव्वा उडवला तेव्हा त्यांच्यापैकी

बरेचजण ख्रिस्ती होते. गॉथ लोकांनी इतरांच्या मालमत्तेचा सन्मान केला आणि त्यांचे नैतिक मानदंड उच्च प्रतीचे होते असे भाष्य मूर्तीपूजक लोकांनीही केले.

## इ. स. 313 हे वर्ष

इ. स. 300 सालापर्यंत राज्यात बरेचसे ख्रिस्ती लोक होते त्यामुळे त्यांचा छळ करणे थांबवण्याचा निर्णय रोमन सरकारने घेतला सम्राट कॉन्स्टटाईन याने आपला जाहिरनामा प्रसिध्द करून ख्रिस्ती धर्म हा कायदेशीर धर्म केला याचे ख्रिस्ती धर्मावर विपरीत परिणाम झाले:



Statue of Constantine

- विश्वास नसणारे अनेकजण मंडळ्यांमध्ये सामील झाले त्यामुळे मंडळ्या निर्जीव झाल्या.
- ख्रिस्ती मंडळ्यांनी रोमन संस्कृतीचे शिष्टाचार स्वीकारले
- बिगर रोमन राष्ट्रांनी त्यांच्या राष्ट्रातील ख्रिस्ती लोकांचा संशय घेउन त्यांना देशद्रोही ठरवले
- मंडळीच्या पुढाऱ्यांनी बाप्तिस्मा घेण्यासाठी बिगर रोमन लोकांना रोमन संस्कृती स्वीकारणे अनिवार्य केले.
- मंडळीच्या पुढाऱ्यांनी ईश्वरपरिज्ञान आणि राजकिय सामर्थ्य याविषयी वादविवाद केले.

2. **तुमच्या सहकाऱ्यांशी चर्चा करून येणाऱ्या आठवड्यातील कार्यक्रमांची योजना आखा.**

भाग 1 मधील आरंभीची 400 वर्षे या विभागातील कार्यक्रमांची यादी एकत्रित पणे वाचा. त्यापैकी एक किंवा दोन कार्यक्रम निवडून तुम्ही आणि विश्वासणारे अशाच गोष्टी तुमच्या मंडळीत कशा प्रकारे करणार याची योजना आखा.

तुम्ही शिक्षण देत असणाऱ्या नवशिक्या मेंपाळांची भेट ह्या आणि त्यांना ह्या अभ्यासातून प्राचीन मंडळीचा इतिहास किंवा त्यांच्या गरजे प्रमाणे अन्य विषय शिकवा PTLT हा मेनू वापरा.

3. **तुमच्या सहकाऱ्यांशी चर्चा करून येणाऱ्या उपासने सभेविषयी योजना आखा.**

भाग1 मध्ये उल्लेख केलेले शास्त्रभाग विश्वासणाऱ्यांना वाचायला सांगा त्यातून प्रेषितांनी येशूच्या सुवार्तेचा प्रसार कसा केला ते समजेल तसेच मंडळीच्या इतिहासाच्या आरंभीच्या 400 वर्षांच्या काळामध्ये विश्वसणाऱ्यांनी सुवार्ता कशी पसरवली हे स्पष्ट करून सांगा.

- विश्वासणाऱ्यांनी त्यांना सुवार्ता कशी समजली याची **साक्ष द्यावी.**
- मुलांनी तयारी केलेली नाटिका त्यांना सादर करू दया.
- **प्रभुभोजनाचा विधी** साजरा करताना प्रकटी 3:20 हे वचन वाचा आणि 'दार' म्हणजे काय हे थोडक्यात सांगा.
- एकत्रित **पाठ करा** मत्तय 24:14
- दोघा तिघांच्या लहान **गटांना** योजना आखून, एकमेकांसाठी प्रार्थना करण्यास तसेच प्रोत्साहन देण्यास सांगा.

Copyright 2004 © by Paul-Timothy. May be freely copied. Download from www.Paul-Timothy.net